# ग्रामीण आत्मचरित्रांचा प्रारंभकाळ

डॉ. पवन मांडवकर
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ, महाराष्ट्र ४४५ ४०१ (India)
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
E mail: pavanmandavkar@hotmail.com भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८

## सारांश

अव्वल इंग्रजी कालखंडात मराठी साहित्यात 'आत्मचरित्र' हा प्रकार अस्तित्वात आला. प्रारंभीच्या काळात केवळ आपल्या जीवनातील अनुभव कथन करण्याच्या साहित्यिकांच्या अभिलाषेतून पुढे प्रगत पावलेला हा प्रकार आहे. साधारणतः आयुष्याच्या उत्तरार्धात लेखकांनी हे लेखन केले आहे. निरंजन माधव यांच्या 'संप्रदाय परिमल' पासून नाना फडणवीस, गंगाधरशास्त्री पटवर्धन, वासुदेव बळवंत फडके, गोविंद बाबाजी जोशी, गोडसे भटजी, बाबा पद्मनजी यांच्यापर्यंत सुरूवातीचे आत्मचरित्रपर लेखन आढळते. 1960 च्या सुमारास मराठी साहित्याचा प्रस्थापितांना नाकारणारा, परंपरा झिडकारणारा विद्रोही प्रवाह निर्माण झाला. त्याला दलित आत्मकथने असे संबोधले गेले. दया पवार, प्र.ई. सोनकांबळेंपासून अनेक दलित लेखकांनी त्यांच्या जीवन कथा सांगितल्या. बहुतेकांचे जीवन ग्रामीण भागात गेल्याने तेथील संस्कृती, राहणीमान, भाषा या सर्वांचा समावेश यात होतो. मात्र दलित साहित्याची वेगळी चूल निर्माण झाल्याने त्यांना ग्रामीण आत्मचरित्र म्हटले गेले नाही.

आनंद यादव यांचे 'झोंबी' हे पहिले ग्रामीण आत्मचरित्र. वि.द. घाटे, महर्षी धोंडो केशव कर्वे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, गोदावरी परुळेकर, पांडुरंग चिमाजी पाटील (थोरात), प्र.के. अत्रे, आनंदीबाई शिर्के यांचेही बालपण ग्रामीण भागात गेले. त्यांनीही आत्मचरित्रपर लेखन केले आहे. रा.ना. झोळ यांचे 'रामप्रहर', 1992 मध्ये प्रकाशित झालेले अप्पा कोरपे यांचे 'मी तो हमाल' या कलाकृती ग्रामीण आत्मचरित्रेच आहेत.

ग्रामीण भागात राहिलेले आणि कालांतराने शहरात गेलेले बहुतेक ग्रामीण साहित्यिक हे दलित, बहुजन समाजातील आहेत. ही ग्रामीण मंडळी त्यांची आत्मकथने किंवा ग्रामीण आत्मचरित्र निर्मिती करीत आहेत. मात्र काहीशी उपेक्षित ग्रामीण आत्मचरित्रांची ही वाङ्.मयशाखा अधिक विकास पावण्याची गरज आहे.

**Abstract**

Autobiography came in Marathi literature during the top English period. This is an advanced step forward in the early days of the literary aspirations of narrating only our life experiences. Writers usually write their autobiography later in life. Early autobiographical writings can be found from Niranjan Madhav's 'Sampraday Parimal' to Nana Fadnavis, Gangadhar Shastri Patwardhan, Vasudev Balwant Phadke, Govind Babaji Joshi, Godse Bhatji, Baba Padmanji. Around 1960, a rebellious stream of Marathi literature was occurred to reject the established and traditions. It was referred to as a Dalit autobiography. Daya Pawar, P.E. Sonakamble and many Dalit writers told their life stories. As most of them are form rural areas, the culture, lifestyle and language are all included. However, due to the creation of separate section of Dalit literature, that writings are not called rural autobiographies.

Anand Yadav's 'Zombi' is the first rural autobiography. V.D. Ghate, Maharshi Dhondo Keshav Karve, Maharshi Vitthal Ramji Shinde, Godavari Parulekar, Pandurang Chimaji Patil (Thorat), P.K. Atre, Anandibai Shirke's childhood also went to rural areas.They have also written autobiographies. N.R. Zol's 'Rampahar', Appa Korpe's 'Mi To Hamal' which was published in 1992, are rural autobiographies.

Most of these writers who have lived in rural areas and then went to the city, are from Dalit, Bahujan community. These rural writers are producing their rural autobiographies. But this neglected branch of rural autobiography needs more development.

बीजशब्द :— आत्मचरित्र, जीवन कथा, ग्रामीण साहित्य, दलित आत्मकथने, झोंबी

## प्रस्तावना

आत्मचरित्र हा प्रकार इंग्रजी साहित्यातील 'ऑटोबायोग्राफी'वरूनच आला. अव्वल इंग्रजी कालखंडात मराठी लेखकांनी आपापल्या जीवनकथा सांगण्यास प्रारंभ केला आणि त्यांना आत्मचरित्र म्हटले गेले. कालांतराने ग्रामीण भागात बालपण व्यतीत करून जातिभेदाच्या चटक्यांमुळे किंवा अन्य कारणाने शहरात जाऊन सुशिक्षित झालेल्या अस्पृश्य समाजातील लेखकांनी आपल्या ऐन उमेदीतही आपले जीवन कथन केले. ती 'ग्रामीण आत्मकथने'च होती; परंतु 'दलित साहित्य' संकल्पना रुजल्यामुळे त्यांना 'दलित आत्मकथने' संबोधले गेले. ग्रामीण भागातील बहुजन समाजातील किंवा अन्य साहित्यिकांनीही शहरात गेल्यावर ग्रामीण जीवनाशी संबंधित लेखन केले; परंतु कथा, कादंबरी, कविता यात ते अधिक रमले. त्यामुळे ग्रामीण आत्मचरित्राची वाङ्मयशाखा काहीशी दुर्लक्षितच राहिली. ग्रामीण भागात जीवन व्यतीत केलेल्या साहित्यिकांनी त्यांची आत्मचरित्रे लिहिण्याची आज गरज आहे.

## मराठीतील प्रारंभीची आत्मचरित्रे

मराठी साहित्यात 'आत्मचरित्र' हा वाङ्मयप्रकार नवा नाही. निरनिराळ्या क्षेत्रातील लेखकांनी आत्मचरित्र लिहून वाङ्मयप्रकाराचे हे दालन संपन्न आणि समृद्ध केले आहे. इंग्रजी कालखंडापासून आत्मचरित्रांची परंपरा दिसून येते. अव्वल इंग्रजी कालखंडात ती मराठीमध्ये रुजली.

आत्मचरित्र हा प्रकार सोपाही आहे आणि कठीणही आहे. 'अंगातून काढलेल्या सदऱ्याप्रमाणे आपले अंत:करण उलटे करून त्याची आतली बाजू आत्मचरित्रकार वाचकांना दाखवत असतो.... कधीकधी आपल्या कार्याचा आत्मचरित्राद्वारे प्रचार करणे, आपल्याविषयी जगात गैरसमज पसरले असल्यास आत्मसमर्थन करणे, हेही आत्मचरित्र लिहिण्यामागचे हेतू असू शकतात.'[१]

आत्मचरित्राच्या संदर्भात डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, 'वस्तुतः माणूस आत्मचरित्र लिहिण्याच्या मन:स्थितीत येतो, तेव्हा त्याला अखेरचा मुक्काम जवळ आल्याची जाणीव होते. कुठेतरी विविध संबंधांनी गुरफटलेल्या 'मी'ला आपले व्यक्तित्व हरवल्याची किंवा लोक आपल्याला विसरून चालले आहेत, याची बोच सलत राहते आणि मग हा 'मी' आपल्या जीवनाचा पट मांडून त्यात रमून जातो.'[२] जीवनाविषयीची कृतार्थता, समाधान या लेखनात आढळून येते. लेखकांची निरीक्षणे निरपेक्ष वृत्तीने व भावनांच्या अथवा विकारांच्या आहारी न जाता नोंदविलेली आहेत. वाङ्मयीनदृष्ट्या त्यांचे मोल अधिक आहे.

निरंजन माधव यांनी लिहिलेला 'संप्रदाय परिमल' हा सर्वात जुना आत्मचरित्रपर ग्रंथ मानला जातो. यात पती—पत्नी संवादरूप आढळते. बाळाजी जनार्दन उर्फ नाना फडणीस यांनी पेशवाईच्या काळात काही आत्मचरित्रपर लेखन केले आहे. गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचेही आत्मचरित्रपर लेखन आहे. त्यानंतर क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचे 'ज्ञानप्रकाश'मधून प्रसिद्ध झालेले लेखन आत्मचरित्रपर आहे. गोविंद बाबाजी जोशी यांचे ७०० पृष्ठांचे लेखन असलेले 'गेल्या तीस वर्षांपूर्वीचे लोक व त्यांच्या समजुती अथवा माझे प्रवासाची हकिगत' हे एक महत्वाचे आत्मचरित्र. त्यानंतर विष्णूभट, बाळकृष्णपंत गोडसे वरसईकर म्हणजेच गोडसे भटजींचे 'माझा प्रवास' हे पुस्तक आत्मचरित्रपरच मानले जाते. त्यात १८५७ च्या बंडाची व राणी लक्ष्मीबाईच्या प्रत्यक्ष भेटीची हकिगत आहे. १८६८ ते १८८२ पर्यंत लेखन केलेले व १८१८ ते १८४७ पर्यंतचे वर्णन असलेले दादोबा पांडुरंग तर्खडकर यांचे आत्मचरित्र आणि १८८७ च्या सुमारास लिहिलेले बाबा पद्मनजींचे 'अरुणोदय उर्फ स्वलिखित चरित्र' यांचाही उल्लेख सुरुवातीच्या आत्मचरित्रांमध्ये करणे अपरिहार्य आहे.

पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात शिरोभागी शोभणारे आत्मचरित्र म्हणजे लक्ष्मीबाई टिळक यांचे 'स्मृतिचित्रे' (१९३४—३६) हे होय. तत्कालीन परिस्थितीचा जणू हा आरसाच होता. त्यानंतर बदलणाऱ्या समाजजीवनाचे चित्रण कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या १९४० मधील 'माझ्या आठवणी व अनुभव'मध्ये आले आहे. त्यानंतर 'कऱ्हेचे पाणी' या नावाने पाच खंडात आचार्य अत्रे यांनी आत्मचरित्र लिहिले. एकंदरीत मोजक्या का होईना पण आत्मचरित्र प्रकारात गणता येतील अशा काही कलाकृती इंग्रजी राजवटीत निर्माण झाल्या.

## दलित आत्मकथनांचा उदय व ग्रामीण आत्मचरित्रे

१९६० च्या सुमारास दलित साहित्याचा नवाच, पण प्रस्थापितांना नाकारणारा, परंपरा झिडकारून अभिनव निर्मिती करू पाहणारा एक वेगळाच विद्रोही प्रवाह दिसून येतो; आणि मग त्या जोमदार प्रवाहात दलित साहित्यिकांनी स्वत:च्या जीवनकथा लिहिण्यास प्रारंभ केला.

आयुष्याच्या संध्याकाळी न लिहिता आम्ही जे भोगलं, अनुभवलं ते ऐन उमेदीच्या वयात किंवा जेव्हा लिहावंसं वाटलं तेव्हा त्या दिवसापर्यंतचं आयुष्य प्रकट करणाऱ्या दलित लेखकांच्या चरित्रांना आत्मचरित्र न म्हणता आत्मकथने किंवा स्वकथने म्हटले गेले. प्रस्थापितांकडून झालेला छळ, खदखदणारा विद्रोह, नकार अशा विविधांगांनी प्रगट करणारी ही दलित आत्मकथने होती. बहुधा या आत्मकथनांमधून काही अंशी प्रेरणा घेऊन ग्रामीण आत्मचरित्रे लिहिली गेली असावी, असे काही अभ्यासक मानतात.

दलित आत्मकथने किंवा सौ. आरती सोनकुसरे कुलकर्णी यांनी ज्यांना 'स्वकथने' असा शब्दप्रयोग करून मान्यता मिळवून दिली ती अशा दलित समाजातील व्यक्तींची आहेत, ज्यांच्यापैकी अनेकांचे बालपण किंवा आयुष्याचा बराचसा कालावधी ग्रामीण भागात गेला. त्यामुळे 'दलित आत्मकथा या ढोबळ अर्थाने तशी ग्रामीण आत्मचरित्रेच होत. ग्रामीण जीवनच परंतु त्यातही गावकुसाबाहेरच्या ग्रामीण दलित जीवनाचे–उपेक्षित जीवनाचे चित्रण करणारी ती आहेत, हा नंतरचा अधिकच्या तपशिलाचा भाग होतो.'[३]

पहिले लक्षणीय दलित आत्मकथन म्हणून ज्याचा उल्लेख होतो त्या दया पवारांच्या 'बलुतं' (१९७८) मध्ये दगडू मारोती पवारचा दया पवार होईपर्यंत २० वर्षांचा बालपणापासूनचा कालावधी हा ग्रामीण भागातच आणि नंतर शहरी भागातच व्यतीत झाला आहे. ग्रामीण भागात गावकुसाबाहेरचे जगणे यात चित्रित झाले आहे. संवादांमधून वापरलेली ग्रामीण महारी बोली हे या आत्मकथनाचे वैशिष्ट्य.

१९७९ मध्ये प्रकाशित झालेले प्र.ई सोनकांबळेंचे 'आठवणींचे पक्षी' हे तर ग्रामीण महारी बोलीतच निवेदनही करते. प्रल्हादच्या आयुष्यातील हे किस्से, आठवणी वेळोवेळी कथन झाल्या, वृत्तपत्रांतून, नियतकालिकांतून प्रकाशित झाल्या, कालांतराने ग्रंथरूपाने पुढे आल्या.

याशिवाय सुरुवातीच्या काळातील ज्या दलित आत्मकथनांचा उल्लेख करता येईल, त्यात माधव कोंडविलकरांचे 'मुक्काम पोष्ट : देवाचे गोठणे' लक्ष्मण मानेंचे 'उपरा', दादासाहेब मल्हारी मोरेंचे 'गबाळ', पार्थ पोळकेंचे 'पोतराज', शरणकुमार लिंबाळेंचे 'अक्करमाशी', लक्ष्मण गायकवाडांचे 'उचल्या', बेबी कांबळेंचे 'जिणं आमुचं', शांताबाई कांबळेंचे 'माझ्या जल्माची चित्तरकथा', मुक्ता सार्वगौडांचे 'मिटलेली कवाडं' यांचा समावेश होतो. या सगळ्या उपेक्षित, दलित समाजाच्या आत्मकथनांमधून किंवा आत्मचरित्रांमधून आढळणारे चित्रण, प्रसंग, परिसर हे मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागाशी निगडित आहेत. निवेदनाची क्वचित परंतु संवादांची भाषा बहुतेक वेळी जातनिहाय किंवा ग्रामनिहाय आढळते. साहजिकच ग्रामीण जीवनाशी दलित आत्मकथनांची नाळ बांधलेली आहेच.

दलित आत्मकथनांतून ग्रामीण भागात बसलेले अस्पृश्यतेचे चटके, गावकुसाबाहेरील पशुतुल्य जिणे, आंबेडकरी चळवळ, तिचे परिणाम, या समाजात झालेली उत्क्रांती, धर्मांतर, त्याचे परिणाम इत्यादी चित्रण भडकपणे आढळते.

विविध बोली आणि प्रादेशिकतेची वैशिष्ट्ये या आत्मकथनांतून जाणवतात. 'गावकी', 'आठवणींचे पक्षी'मधून मराठवाड्यातील, 'हकीकत व जटायू'मधून वऱ्हाडी, 'मुक्काम पोष्ट  देवाचे गोठणे'मधून कोकणी बोलीच्या लकबी व प्रादेशिक वैशिष्ट्यांचा परिचय होतो. महाराष्ट्र–कर्नाटक सीमेवरील बोली 'अक्करमाशी'मध्ये सातारा–सांगलीकडील 'उपरा', 'आभरान', 'तराळ–अंतराळ', 'गबाळ'मध्ये आढळतात. या सर्वांमध्ये जाणवणारी बोली ही ग्रामीण म्हणून गणली जाते.

या आत्मकथनांतून प्रादेशिक वैशिष्ट्यांबरोबरच जीवनशैली, जातिवैशिष्ट्ये व त्या त्या जातीच्या बोलींचा परिचय होतो. 'गबाळ' व 'उपरा'मधून भटक्या समाजाची, 'काट्यावरची पोटं', 'राघववेळ'मधून मांगांची, 'मिटलेली कवाडं', 'बलुतं', 'फांजर', 'हकीकत व जटायू', 'अक्करमाशी', 'माऱ्हुडा'मधून महारांची, 'कथा माझ्या जन्माची', 'मुक्काम पोष्ट देवाचे गोठणे' मधून चांभारांची; तर 'कोल्हाट्याचं पोर'मधून कोल्हाटी समाजाची भाषिक वैशिष्ट्ये व जातिवैशिष्ट्ये लक्षात येतात. यांना गावगाड्यातून वेगळे कसे काढता येईल? साठनंतर 'दलित साहित्य' हा वेगळा वाङ्मयप्रवाह निर्माण झाला नसता तर कदाचित यामधील बहुतेक साहित्य 'ग्रामीण साहित्य' म्हणूनच गणले गेले असते.

## ग्रामीण आत्मचरित्रांचा प्रारंभ

ग्रामीण आत्मचरित्र हा प्रकार फारसा हाताळल्या गेला नाही, हे सत्य आहे. ग्रामीण साहित्य हे कथा–कादंबऱ्या व कवितांमध्येच अधिक रमले. तरीदेखील ग्रामीण आत्मचरित्रपर लेखनाचे अध्ययन हा विषय मराठी साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. या लेखनाला काही साहित्यकृती पायाभूत म्हणून उल्लेखिता येतील.

वि.द. घाटे यांचे 'दिवस असे होते' हे आत्मचरित्र बहुतांशी ग्रामीण भागातील वर्णनाने भरलेले आहे. विठ्ठलरावांचा जन्म, बालपण नगरजवळच्या घोसपुरी सारोळे या ग्रामीण भागात गेले. तिथले सर्व वर्णन त्यांनी रेखाटले आहे. मात्र त्यांनी वापरलेली भाषा ग्रामीण म्हणता येणार नाही. शहरी, उच्चमध्यमवर्गीय सुशिक्षितांची भाषा त्यांनी वापरली. शिवाय ते ग्रामीण लेखकही नाहीत, हे नमूद केले पाहिजे.

घाट्यांप्रमाणेच महर्षी धोंडो केशव कर्वे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, गोदवरी परुळेकर, पांडुरंग चिमाजी पाटील (थोरात), प्र.के. अत्रे, आनंदीबाई शिर्के, यशवंतराव चव्हाण यांचेही बालपण ग्रामीण भागात गेले व त्यांनीही आत्मचरित्रपर लेखन केले. कोकणातील मुरुडसारख्या खेड्यात जन्मलेल्या कर्व्यांनी साहजिकच या परिसराचे वर्णन केले. कोल्हापूरच्या वडगाव गावातील पांडुरंग चिमणाजी पाटील यांनी कोल्हापूर भागातील ग्रामीण जीवन चित्रित केले. गोदावरी परुळेकरांनी आदिवासी क्षेत्रात काम केल्याने त्या त्या भागातील वर्णने त्यांनी केली. अत्रे तर पुण्याजवळच्या सासवडसारख्या लहानशा गावात लहानाचे मोठे होत गेल्याने त्यांना त्या खेड्यातील वर्णनात रमता आले, हे आपल्याला 'कऱ्हेचे पाणी' वाचताना जाणवत राहते. असे असले तरी त्यांची त्यांच्या बालपणीच्या ग्रामीण जीवनमानाकडे पाहण्याची दृष्टी नागर वाटते. सुशिक्षित, संस्कारित, बुद्धिवाद्यांच्या परिसरातील चिंतनशीलतेतून उतरलेले हे लेखन असल्याने त्याला ग्रामीण आत्मचरित्रे म्हणणे धारिष्ट्याचे ठरेल. असेच काहीसे विठ्ठल रामजी शिंदे यांच्या 'माझ्या आठवणी' या आत्मचरित्राबाबत म्हणता येईल. मात्र हा ग्रामीण आत्मचरित्राचा पाया होता किंवा ग्रामीणत्वाच्या पुसटशी पाऊलखुणांनी भारलेले हे लेखन आहे, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.

'मराठीतील पहिले—वहिले, विशुद्ध व परिपूर्ण असे ग्रामीण आत्मचरित्र म्हणून ज्याचा अस्सलपणे उल्लेख करता येईल, ते म्हणजे आनंद यादव यांचे 'झोंबी'. आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्ट्या ग्रामीणत्वाचा पुरेपूर प्रत्यय या आत्मचरित्रातून येतो.'[४] १९८७ मध्ये ते प्रकाशित झाले. मात्र आनंद यादवांच्या जीवनाच्या उत्तरार्धात ते लिहिलेले नाही. त्यामुळे त्यांनी आणखी 'नांगरणी' व 'घरभिंती' हे त्यांच्या आत्मचरित्राचे अन्य दोन खंड पुढे १९८७ ते १९९२ या कालावधीत प्रकाशित केले.

या तीनही आत्मचरित्रपर ग्रंथांतून ग्रामीण जीवन प्रकट झाले आहे. मात्र पहिल्या ग्रंथात म्हणजेच 'झोंबी'मध्ये जो नायक ग्रामीण भागातच आपले जीवन व्यतीत करतो आहे, तो 'नांगरणी' आणि 'घरभिंती'मधून बाहेर पडून शहराकडे गेल्याचे जाणवते. उच्च शिक्षण घेण्यासाठी बाहेर पडलेला नायक, आकाशवाणीत नोकरीही करतो, प्राध्यापकही होतो मात्र मूळ गाव कागल, तिथले त्याचे घर, आई—वडील, नातेवाईक यांच्याशी जुळलेले भावबंध तसेच राहतात. पुढे वेगवेगळ्या शहरांशी नाळ जुळत जाते व शेवटी पुण्यात स्थायिक झाल्याचे वर्णन येते, भाषा नागरी होत जाते आणि त्यामुळे ग्रामीण आत्मचरित्राचे अध्ययन करताना 'झोंबी'वरच आपल्याला अधिक लक्ष केंद्रित करावे लागते. आनंद यादवांनी त्यानंतर 'काचवेल' या ग्रंथाचेही लेखन केले असून त्यातही जीवनकहाणीचा उत्तरार्ध आलेला आहे.

भालचंद्र नेमाडेंच्या 'कोसला' मधून वर्णिलेली पांडुरंग सांगवीकर या ग्रामीण भागातील तरुणाची कहाणी म्हणजे ग्रामीण जीवनाचे कथन असल्याने ती आत्मचरित्रात्मक कादंबरी ठरते. अनेक समीक्षक ते मानत नाहीत, हा भाग वेगळा! अमरावती जिल्ह्यातील परतवाड्याच्या गो.नी. दांडेकरांनी लिहिलेले आत्मचरित्र 'स्मरण गाथा'. त्यातही त्यांच्या सुरुवातीच्या १३ वर्षांच्या काळातील वर्णन ग्रामीण भागातीलच आहे.

१९८५—८५ मध्ये प्रकाशित झालेले रा.ना. झोळ यांचे 'रामप्रहर', १९९२ मध्ये प्रकाशित झालेले अप्पा कोरपे यांचे 'मी तो हमाल' यांचाही उल्लेख ग्रामीण आत्मचरित्रे म्हणून केला जातो. 'रामप्रहर'मध्ये लेखकाचे वडील वारल्यावर त्यांच्या विधवा आईने अत्यंत कष्टाने त्यांना व त्यांच्या भावाला कसे वाढवले, त्यांचे शिक्षण, त्यांच्या आवडीनिवडी अशी सगळी वर्णने संपूर्ण खेड्यातील जीवनाच्या आलेखासह प्रकट होतात. निवेदनात लोककथाकाराचा बाज असलेल्या 'मी तो हमाल' मध्ये पारनेर तालुक्यात जन्माला आलेल्या व नगरला हमाली करणाऱ्या लेखकाचा जीवनसंघर्ष आहे.

## समारोप

'लेखक आपला जीवनानुभव व्यक्त करतो तो शब्दांतून! आपल्या मनातील भावनांना आणि विचारांना तो मुक्त आविष्कार देतो. या आविष्काराचे महत्त्व अनन्यसाधारण असते, त्याचा आस्वाद घेण्यात आनंद असतो. पण लेखकाने आपला जीवनानुभव व्यक्त करताना एक तात्त्विक भूमिका घेतलेली असते. ती तात्त्विक भूमिका लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग असते.'[५] हे व्यक्तिमत्त्व त्याच्या प्रत्येक साहित्यकृतीतून उमटत असते. मग ती कथा असो, कादंबरी असो किंवा आत्मचरित्र. ग्रामीण भागात घडलेल्या या बहुतेक नामवंतांनी आपापल्यापरीने जे मांडले ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा काही अंश आहेच, भलेही ते शुद्ध 'आत्मचरित्र' या प्रकारात मोडत नसेना का!

आनंद यादवांसह काही अभ्यासक ग्रामीण साहित्याचे निवेदनही ग्रामीण बोलीभाषेत असावे, अन्यथा ग्रामीणतेच्या प्रत्ययात वाचकांच्या दृष्टीने उणीव निर्माण होते, असे मानतात. ग्रामीण साहित्य निर्माण करणारा लेखक हा दलित साहित्यिकांच्या सूत्राप्रमाणे ग्रामीण मातीतच अंकुरलेला असावा, अशीही अट टाकली जाते. वास्तविक दलित साहित्यातील अनेक कलाकृतींप्रमाणे निवेदनाची भाषा ही सर्वांना समजेल अशी नागर किंवा प्रमाणभाषा आणि प्रत्यक्ष संवाद त्या त्या बोलीभाषेत असतील तर त्या साहित्यकृतीच्या ग्रामीणतेला बाधा पोचेल असे वाटत नाही. शिवाय ती अधिक वाचकांच्या हृदयापर्यंत पोचू शकेल व वाङ्मयीन दर्जाला धक्का पोचण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

अलीकडच्या काळात ग्रामीण साहित्यात जीवनकथा सांगणाऱ्या ग्रंथांची भर पडते आहे; परंतु म्हणावी तशा संख्येने नाही. अजूनही ग्रामीण साहित्यिकांच्या लेखण्या कथा–कादंबऱ्या–कवितांमध्येच रमल्या आहेत. 'दलित आत्मकथा या व्यापक अर्थाने ग्रामीण आत्मचरित्रे होत.' असे काही अभ्यासक मांडतात. तरीदेखील दलित आत्मकथनांनी स्वत:ची वेगळी चूल मांडल्याने त्यांना ग्रामीण आत्मचरित्रे म्हणण्याचे धाडस समीक्षक करत नाहीत. मात्र ही सगळी आत्मकथने तळागाळातील, पिचलेल्या शोषितांची असून त्यांच्या आयुष्याचा बराचसा कालावधी हा ग्रामीण भागातच गेला आहे; मात्र ते स्वत:ला ग्रामीण लेखक म्हणवून घेत नाहीत. शहरी वातावरणात वाढलेले साहित्यिक ग्रामीण साहित्य निर्माण करीत नाहीत आणि त्यांना ग्रामीण साहित्यिक म्हणूनही स्वीकारले जात नाही. प्रारंभीच्या काळातील वर उल्लेखित साहित्यकृती ग्रामीण आत्मचरित्रे म्हटल्या गेल्या तरी त्यांची संख्या अत्यल्प आहे. खरे तर ग्रामीण भागात राहिलेले आणि कालांतराने शहरात गेलेले बहुतेक ग्रामीण साहित्यिक हे बहुजन समाजातील आहेत. हीच मंडळी ग्रामीण आत्मचरित्रांची निर्मिती करीत आहेत. ही वाङ्मयशाखा अधिक विकास पावण्याची गरज आहे, एवढे मात्र खरे!

## संदर्भ


१. जोशी, अ.म., चरित्र–आत्मचरित्र, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीयावृत्ती, १९९९, पृ. ९० व ९४.
२. भालचंद्र फडके, 'अलीकडची आत्मचरित्रे', महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे, वर्ष ४८, अंक एप्रिल–मे–जून, १९७६, पृ. ५१.
३. घाटुगडे, डॉ. आनंद, ग्रामीण आत्मचरित्रांचा उदय, ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, संपा. चंद्रकुमार नलगे, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, आवृत्ती २०१३, पृ. १९९.
४. उनि., पृ. २०२.
५. फडके, डॉ. भालचंद्र, किरवले, डॉ. कृष्णा, ग्रामीण साहित्याचे तत्त्वज्ञान आणि स्वरूप, ग्रामीण साहित्य, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पृ. ४०–४१.


□□□